दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक ३५६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.२१ मार्च २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## डेलकर प्रकरण दाबण्यासाठी हे कुभांड रचलं गेलंय; सचिन सावंत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केलेत. गृहमंत्र्यांनी दरमहा १०० कोटी रुपयांची मागणी केली, असा दावा परमबीर सिंह यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिलेल्या पत्रात केला आहे. या आरोपानंतर काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी ट्वीट करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रातही विनोद राय प्रवृत्तीचे लोक प्रशासनात आहेत. सत्यपाल सिंह आघाडी सरकारला कळले नाही. जे पत्र दिसत आहे, त्यामध्ये पश्चात बुध्दी दिसत आहे. जे संभाषण आज दाखवले जात आहे ते वर्षभरापूर्वीच झाले असते. अँटीलिया प्रकरण झाल्यानंतर कोणीही सामान्य बुद्धीचा व्यक्ती ही असे करणार नाही, असे सचिन सावंत यांनी म्हटलंय. जे खंडणीचे आरोप सांगितले जात आहेत ते भाजपाने आधीच कसे केले? सुशांत सिंह राजपूत याची केस पटणा येथे नोंदवली जाऊ शकते तर मोहन देलकर यांची मुंबईत आत्महत्या झाली तिथे का नाही? जीथे गुन्हा घडला तिथेच CRPC प्रमाणे तपास होतो. SMS हे स्वतःला वाचवण्यासाठी दिसत असल्याचेही सावंत म्हणाले.

# गृहमंत्र्यांकडून वाझेंना दरमहा १०० कोटींच्या वसुलीचे टार्गेट

## गृहरक्षक दलाचे प्रमुख परमबीर सिंग यांचा खळबळजनक आरोप

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सचिन वाझे यांना दर महिन्याला १०० कोटी रुपये वसुलीचे टार्गेट दिले असल्याचा गंभीर आणि खळबळजनक आरोप नुकतेच मुंबईच्या पोलिस आयुक्तपदावरून हटवण्यात आलेले पोलिस अधिकारी आणि गृहरक्षक दलाचे प्रमुख परमबीर सिंह यांनी केला आहे. परमबीर सिंग यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून ही माहिती दिली आहे.



परमबीर सिंह यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना ८ पानी दीर्घ पत्र लिहून गृहमंत्री अनिल देशमुख यांची तक्रार केली आहे. या पत्रात सिंग यांनी अनेक गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत. सचिन वाझे यांना पुन्हा सेवेत घेतल्यानंतर त्यांना मंत्र्यांनी कशा प्रकारची टार्गेट्स दिली होती, याचा उल्लेख या पत्रात करण्यात आला आहे. या बरोबर कोणी कोणी वाझे यांना काय काय सांगितले होतं, याबाबतची धक्कादायक माहिती या पत्रात नमूद करण्यात आली आहे.

राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सचिन वाझे यांना हॉटेल, बार आणि इतर मोठ्या अस्थापनांकडून प्रत्येक महिन्याला शंभर कोटी रुपये वसूल करण्यास सांगितले होते, असे परमबीर सिंग यांनी या तक्रारवजा पत्रात म्हटले आहे. एवढी मोठी वसुली करण्याचे दर महिन्याला त्यांना टार्गेट देण्यात आले होते असे पत्राच म्हटले आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना उद्देशून परमबीर सिंग यांनी हे तक्रारवजा पत्र लिहिले आहे. त्यांनी आपल्या पत्रात एकूण २३ मुद्दे लिहिले आहेत. परमबीर सिंग आपल्या पत्रात म्हणतात, 'मार्च महिन्यात मी वर्षा बंगल्यावर आपल्याला भेटण्यासाठी आलो. तेथे मी अँटीलिया स्फोटके प्रकरणावर आपल्याला पूर्ण माहिती दिली. त्यावेळी मी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या भ्रष्ट कारभाराबाब आपल्या तुमच्या कानावर घातले. इतकेच नाही तर मी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देखील अनिल देशमुख यांच्या चुकीच्या कामांची माहिती दिली. मात्र, तेथे उपस्थित असलेल्या इतर मंत्र्यांना तर ही माहिती आधीपासूनच होती हे माझ्या लक्षात आले.

सिंग आपल्या पत्रात लिहितात, सचिन वाझे हे क्राईम इंटिलिजन्स यूनिटचे हेड होते. त्यांना देशमुखांनी अनेकदा आपल्या ज्ञानेश्वर या निवासस्थानी बोलवले होते.

त्यावेळी दर महिन्याला १०० कोटी रुपये जमा करण्याच्या सूचना त्यांना दिल्या. फेब्रुवारीच्या मध्यावर देखील वाझेंना देशमुखांनी ही सूचना केली. त्यावेळेला देशमुखांचे पर्सनल सेक्रेटरी असलेले पलांडे हे देखील हजर होते. एक दोन घरातले कर्मचारीही हजर होते.

दर महिन्याला हे शंभर कोटी रुपये गोळा करण्यासाठी काय करायचे, हेही देशमुखांनी त्यांना सांगितले. मुंबईत १ हजार ७५० बार आणि रेस्टॉरंट असून त्यातील प्रत्येकाकडून दोन ते तीन लाख रुपये गोळा केले तरी देखील एका महिन्याला चाळीस ते पन्नास कोटी रुपये सहज गोळा होतील असे देशमुख यांनी त्यांना स्पष्टपणे सांगितले, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## स्वत:ला वाचविण्यासाठी परमबीर सिंग खोटा आरोप करीत आहेत : गृहमंत्री



मुकेश अंबानी प्रकरणी तसेच मनसुख हिरण हत्याप्रकरणी सचिन वाझे यांचा सहभाग स्पष्ट होत असताना व त्याचे धागेदोरे तत्कालीन पोलिस आयुक्त परमबिर सिंह यांच्यापर्यंत पोहोचणार असल्याची शक्यता तपासातून स्पष्ट होत असताना परमबिर सिंग यांनी स्वतःला वाचवण्यासाठी तसेच पुढच्या कायदेशीर कारवाई पासून स्वतःचा बचाव करण्यासाठी हा खोटा आरोप केला असल्याची प्रतिक्रिया गृहमंत्री अनिल देशमुख यांनी ट्वीटरवरुन दिली आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात कोरोनाने गाठला नवा उच्चांक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात करोनाने नवा उच्चांक गाठला आहे. गेल्या २४ तासांत राज्यात तब्बल २७ हजार १२६ नवीन करोना बाधितांची नोंद झाली असून ॲक्टिव्ह रुग्णांचा आकडा दोन लाखांच्या जवळ पोहचला आहे. दरम्यान, करोनाचा वाढता धोका लक्षात घेता राज्यात लॉकडाऊनसारखा कठोर निर्णय घेतला जाण्याची शक्यता आणखी बळावली आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून करोनाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असल्याचे दिसत आहे. सलग दोन दिवस २५ हजारांवर नवीन रुग्णांची नोंद झाल्यानंतर आज नवा उच्चांक गाठला गेला आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणा तसेच प्रशासन हादरलं आहे. यात नागपूर, पुणे, मुंबई आणि ठाणे या शहरांत करोनाची सर्वाधिक रुग्णवाढ होत आहे. त्यामुळे या शहरांत आधीच कोविडचे नियम कठोर करण्यात आलेले आहेत. अशावेळी आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे राज्यासाठी लॉकडाऊनसारखे कठोर आणि टोकाचे पाऊल उचलू शकतात, असेही बोलले जात आहे.

राज्यात आज २७ हजार १२६ नवीन रुग्णांचे निदान झाले असून करोना संसर्गाने महाराष्ट्रात शिरकाव केल्यापासूनचा हा उच्चांकी आकडा ठरला आहे. आज १३ हजार ५८८ रुग्ण बरे होऊन घरी परतले असून आतापर्यंत एकूण २२ लाख ३ हजार ५५३ करोना बाधित रुग्णांनी करोनावर मात करण्यात यश मिळवले आहे.

## सेवेशी तत्पर त्याचे नाव देशमुख




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे कार्यतत्पर आयुक्त सुधाकर देशमुख यांना ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते सुनील पोतदार यांनी शुक्रवार दिनांक १९ मार्च रोजी एक संदेश त्यांच्या मोबाईलवर पाठविला होता आणि ते काम देशमुख यांनी तात्काळ २० मार्च रोजी दखल घेऊन पूर्ण केले म्हणून पनवेल शहरांतील नागरिक म्हणत आहेत की कार्याशी तत्पर त्याचे नाव देशमुख.

पनवेल शहरांतील लोखंडी पाडा परिसरात जिल्हा सत्र न्यायालयाच्या समोरील चौकात असणारे पथदिवे गेले दोन महिन्यापासून बंद आहे . याबाबत पत्रकार पोतदार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना अनेक फोन केले होते. परंतु त्याची दखल झोपेचे सोंग घेतलेल्या अधिकाऱ्यांनी न घेता त्याकडे दुर्लक्ष केले म्हणून पोतदार यांनी त्याबाबत पनवेल महापालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांना एक मेसेज १९ मार्च रोजी रात्री दहा वाजता पाठविला. त्याची दखल आयुक्त देशमुख यांनी तात्काळ घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना सदर पथदिवे नव्याने सुरू करण्याबाबत आदेश दिले होते व ते दिवे २० मार्च रोजी सकाळी अकरा वाजता सुरू करण्यात आले. त्यामुळे देशमुख यांची कार्यतत्परता दिसून आल्यामुळे पनवेल शहरांतील नागरिक म्हणत आहे की कार्याशी तत्पर सुधाकर देशमुख.

## आ.प्रशांत ठाकूर यांची उपजिल्हा रुग्णालय आणि नागरी आरोग्य केंद्राला भेट

### कोरोना लसीचा आढावा आणि नागरिकांशी संवादही



**दै.रायगड नगरी । पनवेल**

१ मार्च २०२१ पासून पनवेल महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या आदेशानूसार कोव्हिड-१९ लसीकरणाचा टप्पा सुरू करण्यात आला आहे. पालिका क्षेत्रातील आठ सरकारी रुग्णालये तसेच दहा खाजगी रूग्णालयांमध्ये हे लसीकरण चालू आहे.

त्या अनुषंगाने भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल येथील महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय आणि नागरी आरोग्य केंद्र पनवेल या ठिकाणी भेट देत नागरीकांना देण्यात येणाऱ्या लसींची माहिती घेतली.

तसेच लस घेतलेल्या नागरिकांशी संवाद साधून, लसींची साठवणूकी बद्दलचा आढावा घेतला. या वेळी नगर-सेवक डॉ अरुणकुमार भगत, युवामोर्चाचे जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस चिन्मय समेळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## खाजगी जागेत ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यास ग्रामस्थांचा विरोध

### रोहा तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांना दिले सह्यांचे निवेदन

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील पिंगळसई ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयाची नवीन वस्तू बांधण्यात येत असून नुकतेच त्यासाठीचे भूमिपूजन खा. सुनील तटकरे यांच्याप्रमुख उपस्थितीत पिंगळसईत करण्यात आले. मात्र खाजगी जागेत सदर इमारत बांधण्यास काही ग्रामस्थांचा विरोध केला असून याबाबतचे लेखी तक्रारपत्र रोहा तहसीलदार आणि गटविकास अधिकारी रोहा यांना ग्रामस्थांनी सह्यांची मोहीम राबवून सादर केले आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवकांनी ग्रामस्थांचे म्हणणे विचारत न घेता ठराव घेतला असल्याचे आरोप काही ग्रामस्थांनी केला आहे. जुन्या इमारतीच्या ठिकाणीच नवीन इमारत उभी करावी म्हणून काही प्रमुख ग्रामस्थानी हे सह्यांचे निवेदन दिले आहे. यावेळी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष सुनिल देशमुख, बबन शांताराम मोहिते, शंकर काशिनाथ शिंदे, रमेश भिकू देशमुख, पांडूरंग वाघमारे, प्रमोद देशमुख, संतोष सोनू खेरटकर आदी उपस्थीत होते. ग्रुप ग्रामपंचायत पिंगळसईचे नवीन कार्यालय बांधण्यासंबधी १ मार्च रोजी ठरावीक लोकांच्या सह्या घेण्यात आल्या व लगेचच २ मार्च रोजी अतीतातडीची सभा घेण्यात आली असे काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनिल देशमुख यांनी सांगितले. या सभेत जूने ग्रामपंचायत कार्यालय रद्द करुन गावापासून काही अंतरावर खाजगी जागेत ग्रामपंचायत कार्यालय बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. खाजगी मालकाकडून देण्यात आलेली ४ गुंठे जागा ही भातशेती असल्याने त्या जागेत बांधकाम करणे बेकायदेशीर आहे. त्याचप्रमाणे सदर मिळकतिची आवश्यक ती बिनशेती परवानगी घेऊन जमीन नोंदणीकृत दस्ताद्वारे ग्रामपंचायतीच्या नाव-ावर करुन त्यावर बांधकाम करणे आवश्यक होते. ग्रामपंचायत कार्यालय जुन्या जागेत न बांधता खाजगी लांब असलेल्या

..../२

## श्रीवर्धनमध्ये भेंडी बंदर जेट्टीजवळ २१ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार नदीम मुस्तफा दिवेकर वय वर्ष २१, हा काल दिनांक १९ मार्च शुक्रवारी रोजी श्रीवर्धन भेंडी बंदर येथे दुपारी १२:०० वाजण्याच्या सुमारास नदीम स्वतः आपल्या भाउ व मित्रा सोबत पोहायला गेला. भरतीच्या पाण्याचा अंदाज नसल्याने तो पाण्यात बुडाला.

नदीमच्या भावाने व मित्राने त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला होता, पण ते त्याना वाचवण्यास अपयश आले. या घटनेची माहिती कळताच श्रीवर्धन पोलिस ठाण्याचे सहायक उपिरीक्षक राजेश रसेडे तसेच श्रीवर्धन तालुक्याचे तहसीलदार सचिन गोसावी आपल्या टीम सोबत तसेच स्थानिक लोकांच्या मदतीने ताबडतोब शोध कार्य सुरू केले. या शोध कार्यात संपूर्ण पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, नगरपालिका अधिकारी, सागरी सुरक्षा पथक, व सात स्थानिक बोटी व नागरिक पुर्ण दिवस व रात्री उशिरापर्यंत शोध घेत असता त्याचा मृतदेह आज शनिवार दिनांक २० मार्च२०२१ रोजी सकाळी ६:३० वा. पाण्यात दिसून आला असता, अथक प्रयत्न करून ७:०० वा बाहेर काढण्यात आला.

सदर बाबत श्रीवर्धन पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात येऊन, नदिम याचे शव विच्छेदन उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे करून मृतदेह नातेवईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेचा तपास श्रीवर्धन पोलीस ठण्याचे पोलिस निरिक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गद्शनाखाली, त्यांचे सहकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश रसेडे करत आहेत. दिवेकर कुटुंब्यावर या घटनेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## वाळूचे हौद केले नष्ट, पनवेल तहसीलची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वाघिवली, जुई कामोठे खारघर, कोली-कोपर याठिकाणी खाडीपात्रात अनधिकृत वाळूचा साठा केलेले वाळूचे हौद पनवेल तहसील कार्यालयामार्फत नष्ट करण्यात आले आहेत.



वाघिवली, जुई कामोठे, खारघर, कोली कोपर याठिकाणी खाडीतून वाळू साठा काढून वाळू साठा केल्याची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांना मिळाली होती. त्यानुसार या ठिकाणी वाळू उपसा बाबत तपासणी करण्यासाठी नायब तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली दोन पथकांची नियुक्ती करण्यात आली. या ठिकाणी अनधिकृत वाळूचा साठा सापडून आला. तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वाळूचा साठा करण्यासाठी तयार करण्यात आलेले हौद जेसीबीच्या साह्याने नष्ट करण्यात आले.

तसेच येथील ठिकाण हे निर्मनुष्य असल्याने या ठिकाणी पुन्हा अनधिकृत वाळूचा उपसा किंवा साठा होऊ नये यासाठी वाळूमाफिया द्वारे तयार करण्यात आलेल्या खाजगी रस्त्यावर जेसीबीच्या साह्याने चर खोदण्यात आला आहे. जेणेकरून या ठिकाणी पुन्हा वाळू साठा करून वाहतूक होणार नाही याची दक्षता घेऊन चर खोदण्याचे

..../२

## प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत अन्यथा सिडकोची सर्व कामे आम्ही बंद पाडु : महेंद्र घरत

### अन्यथा सिडको विरोधात आंदोलन उभे राहणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरण पनवेल तालुक्यातील न्हावा-शिवडी सिलिंक प्रकल्प, एम टी एच एल, नेरुळ -उरण रेल्वे प्रकल्प, एन एच-४ आदी प्रकल्पांची कामे अंतिम टप्प्यात आली असुन सिडकोने प्रकल्पग्रस्तांना अद्याप २२.५% दिले नाहीत. स्थानिक क्रशर-क्वारी मालकांना आपला व्यवसाय करण्यासाठी पर्यायी जागा दिली नाही. तसेच ज्या शेतकऱ्यांचे गोडावून, घरे तोडली आहेत अशांना देखील अद्याप प्लॉट दिले नाहीत. परंतु बाहेरील परप्रांतीय लोकांना व व्यवसायकांना मात्र ताबडतोब



भूखंड दिले गेले आहेत. त्यामुळे याबद्दल प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये सिडको विरो-धात प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे गव्हाण येथील ७ घरांचा प्रश्न सुद्धा तातडीने सोडवावा व सिडकोच्या उलवे नोड मधील हौसिंग प्रकल्पामध्ये त्यांना प्लॉट देण्यात यावे. अशा अनेक

..../२

# नकोत नुसते इशारे

देशात कोव्हिड-१९ची दुसरी लाट आली आहे की येऊ घातली आहे, याबाबत तज्ज्ञांत मतभेद असू शकतील; परंतु संसर्ग अतिशय वेगाने वाढत असून, गेले काही दिवस दैनंदिन रुग्णसंख्येचा होत असलेला उच्चांक चिंता निर्माण करणारा आहे. करोनावरील लसीकरणाची मोहीम सुरू असली, तरी १३५ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात सर्वांना लस मिळण्यास काही कालावधी निश्चित लागणार; त्यामुळे सध्या वाढत असलेली रुग्णसंख्या थोपवून धरण्यासाठी परिणामकारक उपाययोजनांची आणि उपचारासाठी आरोग्य सुविधा सज्ज ठेवण्याची आवश्यकता आहे. राज्यात फेब्रुवारीपासून बाधितांची संख्या वाढत असून, तेव्हापासून राज्यकर्ते नागरिकांना काळजी घेण्याचा, मास्क वापरण्याचा, गर्दी टाळण्याचा सल्ला देत आहेत. सुरक्षित वावराच्या नियमांची पायमल्ली होत राहिल्यास कठोर निर्बंध आखण्याचा, राज्यव्यापी लॉकडाउनचा इशाराही देत आहेत. तसेही आता विविध शहरांत परिस्थितीनुसार लॉकडाउन, अंशतः लॉकडाउन, रात्रीची संचारबंदी, लग्न वगैरे समारंभांतील आणि कार्यक्रमांतील उपस्थितांच्या संख्येवर मर्यादा आदी उपाययोजना केल्या जात आहेतच; परंतु याच्या पलीकडे जाऊन विचार आणि कृती करण्याची गरज आहे. करोना रुग्णसंख्येचा आलेख किती दिवस वाढत जाऊन मग उतरणीला लागणार, याचा अंदाज आताच वर्तविता येणे शक्य नाही; तथापि प्रत्येक रुग्णाचे विलगीकरण, बाधित झालेल्यांच्या संपर्कात आलेल्या सर्वांचा कसून शोध घेणे आणि त्यासाठी चाचण्या वाढविणे आवश्यक आहे. सध्या घरातच विलगीकरणात असणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्यांना योग्य उपचार मिळतात की नाही, ते कोणाच्या संपर्कात येत नाही ना, लक्षणे नसलेले रुग्ण मुक्त संचार करीत नाही ना, हे स्थानिक प्रशासनाने अतिशय बारकाईने पाहायला हवे. पुण्यासारख्या ठिकाणी, जिथे दररोज बाधित होणाऱ्यांची संख्या तीन हजारांच्या घरात आहे, तिथे हे फारसे होत नसल्याचे चित्र आहे. अन्यत्रही फार वेगळी स्थिती नाही. ती अशीच कायम राहिल्यास, रुग्णसंख्येमध्ये आणखी विक्रमी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या मार्चमध्ये जेव्हा देशात कोव्हिडचा संसर्ग फैलावण्यास सुरुवात झाली, त्यावेळी ही साथ किती काळ राहील, या विषाणूचा प्रतिकार कसा करता येईल, त्याला कसा प्रतिबंध घालता येईल, याची फारशी कल्पना नव्हती. चीनमधून सुरू झालेली ही साथ युरोपीय देशांत भारताच्या आधी पोहोचली असली, तरी तिथेही सुरुवातीला भयावह स्थिती होती. एकीकडे करोनाच्या साथीने जग व्यापले जात असतानाच, दुसरीकडे विषाणूच्या जनुकीय रचनेचा, त्यामध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा आणि प्रतिबंधक लशीचा अभ्यासही सुरू झाला होता. या अभ्यासाला विक्रमी वेळेत यश आले आणि वर्षभराच्या आत भारतासह अनेक देशांनी लशी विकसित केल्या. लस आल्यानंतरही साथ काही काळ राहील, तिची दुसरी-तिसरी लाट येईल, असा इशारा शास्त्रज्ञ देत होतेच. सार्वजनिक आरोग्याची असुविधाच अधिक असलेल्या देशातील आणि राज्यातील राज्यकर्त्यांनी, करोनाच्या विरोधात लढताना सुरुवातीला अनेक चुका केल्या. चाचण्यांची संख्या वेळेत न वाढविण्यापासून करोना उपचार केंद्रे वेगाने उभी करण्यात दुर्लक्ष करण्यापर्यंत आणि अचानक लॉकडाउन जाहीर करण्यापासून हीच उपाययोजना पुन:पुन्हा करण्यापर्यंत झालेल्या चुकांपासून धडे घेण्याची आज गरज आहे; परंतु तसे होताना दिसत नाही. वर्षभर साथरोगाचा सामना करावा लागत असल्याने प्रशासन थकलेले असू शकेल; परंतु त्याचबरोबर एक प्रमाणित कार्यपद्धतही विकसित झाली असेल. तिची प्रभावी अंमलबजावणी होणे अपेक्षित असताना, बाधितांच्या संपर्कातील लोकांचा माग घेतला जात नसल्याचा, घरात विलगीकरणात असलेल्यांची विचारपूस होत नसल्याचा अनुभव येतो आहे. यामुळेच लक्षणविरहित बाधित बाहेर फिरत आहेत आणि संसर्गाचा वेग वाढवित आहेत. एका बाधितापासून किती जणांना संसर्ग होतो, याचे प्रमाण (आर व्हॅल्यू) साथ आटोक्यात ठेवण्यासाठी महत्त्वाचे आहे. नोव्हेंबर ते फेब्रुवारी या काळात हे प्रमाण एकच्या खाली होते. आता ते देशात १.१९वर गेले असून, गेल्या जुलैनंतरचा उच्चांक आता नोंदविला जात आहे. राज्यात तर हे प्रमाण १.२९ आहे. हे प्रमाण कमी करण्याचे लक्ष्य ठेवायला हवे. त्यासाठी आवाहन, इशारे, निर्बंध आणि लॉकडाउन यांबरोबरच रुग्णांचा योग्य माग घेण्याची आणि रुग्णालय सुविधा सज्ज ठेवण्याचीही आवश्यकता आहे. घरात विलगीकरण शक्य नसलेल्यांसाठी संस्थात्मक विलगीकरणाची सुविधा देण्यापासून, जम्बो उपचार केंद्रे परत सुरू करण्यापर्यंत आणि रुग्णवाहिकांपासून ऑक्सिजन खाटांची संख्या वाढविण्यापर्यंत सर्व उपायांचीही आवश्यकता आहे. सध्या मृत्यूदर कमी असला, तरी तो वाढणार नाही याची काळजी घ्यायला हवी. या उपायांच्या जोडीला लसीकरणाचा वेग वाढवायला हवा. लस नोंदणीसाठी सध्या येत असलेल्या सर्व अडचणी दूर करून, प्रत्येकाला लस देण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम आखायला हवी, तरच करोनाचा कहर कमी करण्यात यश येईल.

# उरण तालुक्यातील १६ कोटींच्या थकबाकी वसुलीसाठी महावितरणची सक्तीची मोहीम ; पाच कोटींची वसुली

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील वाणिज्य, घरगुती आणि सार्वजनिक वीज बिलापोटी असलेल्या सुमारे १६ कोटीच्या थकित रकमेपैकी मार्चपर्यंत सक्तीच्या वसुलीनंतरही फक्त पाच कोटी रुपयांची वसुली करण्यात उरण महावितरणला यश आले आहे.तर वीज चोरीची २१३ प्रकरण उघडकीस आली आहेत .

उरण तालुक्यामध्ये कोरोनाच्या काळातील महावितरण विभागाची वीजेपोटी सुमारे १६ कोटींची वीजबिले थकीत आहेत. यामध्ये शहरी, ग्रामीण ग्रामपंचायतींच्या दिवाबत्तीच्या दिवाबत्तीची साडे आठ कोटी, घरगुती आणि इतर वीज बिलांपोटी साडे सहा कोटी आणि सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या वीज बिलांची ७० लाख अशी एकूण सुमारे १६ कोटींची वीजबिले थकीत आहेत. वरिष्ठांच्या आदेशानंतर उरण महावितरणचे उपअभियंता हरिदास चोंडी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यात जोरदार थकित बिले वसुली मोहीम हाती घेतली आहे.

ग्रामीण भागातील २७ ग्रामपंचायतींच्या हद्दीतील स्ट्रीट लाईट, दिवाबत्तीपोटी साडे आठ कोटीची थकबाकी आहे.थकित रकमेच्या वसुलीसाठी तीन वेळा नोटीसा बजाविल्यानंतरही वीज बिलाची रक्कम भरण्यास ग्रामपंचायतीकडून टाळाटाळ केली जात आहे.

यामुळे कारवाईचा बडगा उगारत थकबाकीदार ग्रामपंचायतींचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता.त्यानंतर अनेक ग्रामपंचायतींनी जमेल त्या प्रमाणे थकबाकीपैकी काही रक्कम जमा केली आहे.

मात्र सक्तीच्या वसुलीनंतरही ग्रामपंचायतीकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही.यामुळे साडे सहा कोटींच्या थकित रकमेपैकी फक्त सहा लाखच रुपये जमा झाले आहेत. अधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर टप्पाटप्प्याने स्ट्रीट लाईटची बिले भरण्याची तयारी ग्रामपंचायतींनी दाखविली आहे. त्यानंतरच ग्रामपंचायतींचा खंडित वीजपुरवठा पुन्हा एकदा पुर्ववत सुरु करण्यात आला असल्याची माहिती उरण महावितरणचे उपअभियंता हरिदास चोंडी यांनी दिली.

घरगुती घरगुती आणि इतर वीज बिलांपोटी थकित असलेल्या साडे सहा कोटींच्या थकित रकमेच्या वसुलीसाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी विविध पथके नियुक्त करून सक्तीच्या वसुलीला सुरुवात करण्यात आली आहे. मात्र सक्तीच्या वसुलीला जाणाऱ्या कर्मचाऱ्यांबरोबर ग्राहक, ग्रामस्थांमध्ये अरेरावी, शाब्दिक चकमक, हाणामारीचे प्रकार घडू लागले आहेत. काही ठिकाणी वीज वसुली अंतर्गत मागील तीन महिन्यांत वीज चोरीच्या एकूण २१३ केसेस दाखल केल्या आहेत.

त्यामुळे केसेस दाखल झालेल्या अनेक ग्राहकांनी शेजारी, जवळपास असलेल्या घरातील मीटर मधुनवीज घेतली आहे.असे गैरप्रकार करु नये असे आवाहन करतानाच अशा ग्राहकांवरही वीजचोरी, वीजपुरवठा खंडित करण्याचा इशारा चोंडी यांनी दिला आहे. तसेच थकित रकमेच्या वेळेत भरणा करून महावितरणला ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन ही चोंडी यांनी केले आहे.

# अठरा वर्षांपुढील सर्वांना कोरोनाची लस द्या; खासदार श्रीरंग बारणे यांची लोकसभेत मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशात कोरोनाने महाराष्ट्र राज्य सर्वाधिक प्रभावित आहे. कोरोना नियंत्रणात आणण्यासाठी सरकार मोठे प्रयत्न करत आहे. राज्याला कोरोना लसीचे जास्तीत जास्त डोस देण्यात यावेत. राज्यातील अठरा वर्षांपुढील सर्व नागरिकांना कोरोनाची लस देण्यात यावी, अशी मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत केली. १८ वर्षांपुढील सर्वांना लस दिल्यास निश्चितपणे महाराष्ट्रातील कोरोनाचा प्रभाव कमी होईल, असेही ते म्हणाले.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत शून्य काळ सत्रात पुणे जिल्ह्यातील, राज्यातील कोरोना रुग्णवाढीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधत वय वर्ष अठराच्या वर असलेल्या सर्व लोकांना लस देण्याबाबत केंद्र शासनाकडे विनंती केली. खासदार बारणे म्हणाले, देशभरात महाराष्ट्र राज्य कोरोनाने सर्वाधिक प्रभावित आहे. महाराष्ट्रात एका दिवसात २५ हजार आठशे कोरोनाबाधित रुग्ण सापडले होते. महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दोन दिवसापूर्वी केंद्र सरकार सोबत चर्चा केली. कोरोना लसीचे जास्तीत- जास्त डोस देण्याची मागणी केली आहे. केंद्र सरकारने ७१ देशांना सहा हजार कोटी कोरोना लसीचे डोस दिले आहेत. महाराष्ट्र राज्य कोरोनाने सर्वाधिक प्रभावित आहे. मी पुणे जिल्ह्यातून येतो. माझा मतदारसंघातील पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण या भागात एक कोटी लोकसंख्या आहे. केंद्र सरकारने पंचेचाळीस वर्षापुढील नागरिकांना लस देण्याची घोषणा केली आहे. पुणे जिल्ह्यात ४५ वर्षांपुढील नागरिकांची संख्या ७३ लाख आहे. केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला जास्तीत जास्त कोरोना लसीचे डोस मिळाले. तर निश्चितपणे महाराष्ट्रातील कोरोनाचा प्रभाव कमी होईल. राज्यातील अठरा वर्षांपुढील सर्व लोकांना कोरोनाची लस दिली. तर, महाराष्ट्रातील कोरोनाचा प्रभाव कमी होईल. महाराष्ट्र सरकार, महाराष्ट्र राज्य कोरोनाशी लढा देत आहे, ते कमी होईल, असे खासदार बारणे म्हणाले.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# ऑनलाइन जुगार, १२ जणांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऑनलाइन जुगार चालवण्याप्रकरणी २ ठिकाणी छापा टाकून पोलिसांनी बारा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करून सीलबंद करण्यात आला आहे. नवीन पनवेल शहरात आणि सुकापुर येथे ऑनलाईन जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार पोलिसांनी पाली देवद या ठिकाणी धाड टाकून सुरेश कांचन , महादेव मिसाळ, सुजय कसबे, विनोद चौधरी, सुदर्शन जाधव, मनोज केदारे, दयासागर देवकाते, सुनील देशपांडे हे जुगार खेळताना आणि जुगार चालविताना सापडून आले. यावेळी सदरचा संगणकाद्वारे चालविण्यात येणाऱ्या जुगाराचा एजन्सी डिस्ट्रीब्यूटर किशोर पाटील हा असून निलेश मानकर आणि रवी शेट्टी असे मॅनेजमेंट पाहत असल्याचे आरोपींकडून सांगण्यात आले. तर नवीन पनवेल येथे धाड टाकली असता त्या ठिकाणी विनायक दशरथ दवणे (दुन्द्रे), निलेश पांडुरंग तांबे (खांदा कॉलनी), अजयकुमार शेरे चव्हाण (टेंभोडे), राजीव अफसर शेख (देवदगाव) हे जुगार चालवताना सापडून आले. यावेळी एजन्सी डिस्ट्रीब्यूटर संदीप भालेराव असल्याचे सांगण्यात आले.

बारा आरोपींविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सतरा वर्षीय तरुणाने केला तेरा वर्षीय मुलीवर बलात्कार, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील एका गावामध्ये १७ वर्षीय तरुणाने १३ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याची घटना घडली आहे. तालुका पोलिस ठाण्यात आरोपी विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील पीडित तरुणी आणि सतरा वर्षीय आरोपी हे समोरासमोर राहत असून पीडित तरुणी बाहेर वाळत टाकलेले सुकलेले कपडे काढत असताना आरोपीने तिला घरात बोलावले.

यावेळी तिच्यावर अतिप्रसंग करण्यात आला. याठिकाणी पीडित तरुणीची शिक्षिका आली असता हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर पीडित तरुणीच्या आई-वडिलांना या घटनेची माहिती देण्यात आली. तालुका पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक योगिता कुदळे करत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.जगन्नाथ नामा पोपेटा, रा.सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड यांचे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्यांच्या मालकीच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. त्या मिळकती संदर्भात पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात दाखल केला आहे व सदर दिवाणी दावा न्यायप्रविष्ठ आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| शिलोत्तर रायचूर | ४५ | २/ब | ०-२३-० | २.२४ |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतीबाबत मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांचे कोर्टात रे.मु.नंबर २८६/२०१९ हा दावा १) श्री.विनय विजय अगरवाल २) श्री.भिमजी नानजी पटेल यांचे विरोधात पनवेल येथील न्यायालयात प्रलंबित असताना देखील दाव्यातील प्रतिवादी १) श्री.विनय विजय अगरवाल २) श्री.भिमजी नानजी पटेल यांनी बेकायदेशीररित्या दावा मिळकत विकण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तसेच सदर जमीन त्यांचे ताबेकब्जात व मालकीत असल्याचे भासवून नैना प्रकल्पामध्ये जमीन समाविष्ट झाल्यानंतर त्या मोबदल्यात मिळणारे भूखंड घेण्याचे प्रयत्नात आहेत. तरी कोणत्याही इसमाने अगर संस्थेने प्रतिवादी १) श्री.विनय विजय अगरवाल २) श्री.भिमजी नानजी पटेल यांचे बरोबर वरील शेतजमीन मिळकती संदर्भात साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिस पत्र चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध किंवा वरील मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार करू नये. जर तसे केल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध होणार नाही, किंवा असा हितसंबंध निर्माण झाल्यास ते बेकायदेशीर हक्क हितसंबंध आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.२०/०३/२०२१**

**सही/-**
**ॲड.प्रदीप श. म्हात्रे**
**ॲडव्होकेट्स ॲण्ड लिगल कन्सल्टंटस्**
**कार्या-बी/१०४, पहिला मजला, पायोनिअर को.ऑप.हौसिंग सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.राायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.हरजी गणेशा गजेरा, रा.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड नांवे ७/१२ सदरी महसूल दप्तरी आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.हरजी गणेशा गजेरा | ९७/१ | ०-०७-९० | ०.४४ |
| | ९६/३/अ | ०-१०-०० | ०.७७ |
| | ९५/२ | ०-२०-५० | १.५७ |
| | ९५/१/ड | ०-०१-३० | ०.०३ |
| | ४०/६ | ०-४२-५० | ७.१९ |

मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक श्री.हरजी गणेशा गजेरा रा.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून सदरहू शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.२१/०३/२०२१**

**सही/-**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.९, पवन अपार्टमेंट, नवीन कोर्टाचे जवळ, लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

ॲड.वसीम धुरू पटेल
ॲड.रिहान शाह

## जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्रं.३१२/२०२०
ने.ता.०५/०५/२०२१

उमेर इसा मुल्ला — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका — सामनेवाला

ज्याअर्थी उमेर इसा मुल्ला हिचा जन्म दि.२५/०८/१९७२ रोजी मौजे : तळोजा पाचनंद पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी जन्म झाला असून तिच्या जन्माची नोंद पनवेल महानगरपालिका यांचेकडे झाली नसल्याने तिच्या जन्माची नोंदीकरिता अर्जदार प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब पनवेल यांच्या कोर्टात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला असून त्याच्या जन्मा नोंदणीबाबत कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असलयास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची लागलीच कारवाई करेल आणि ते जर अर्जदार उमेर इसा मुल्ला जन्माच्या दाखला देण्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांच्या मृत्यू नोंदणीचा अर्ज मंजूर करेल याची दखल घ्यावी.

आज दि.१६/०३/२०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक प्रथमवर्ग न्या.सो.पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक प्रथमवर्ग न्या.सो.पनवेल

राव साहेब
अर्जदारातर्फे वकील : ॲड.यशवंत पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.३५६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०४/२०२१

कै.मंगेश पांडुरंग पाटील यांचे कायदेशीर वारस खालीलप्रमाणे
१) स्मिता मंगेश पाटील
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) अदिती मंगेश पाटील
वय : २८ वर्षे
३) अपूर्वा मंगेश पाटील
वय : ३० वर्षे
वरील सर्व अर्जदार रा.के.एल./४/६६/२, सेक्टर ४ ई, गर्व्हमेंट कॉलनी जवळ, कळंबोली नोड एस.ओ., पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

१) या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै.मंगेश पांडुरंग पाटील यांचे कायदेशीर वारस अर्जदार नं.१ ही त्यांची पत्नी असून अर्जदार नं.२ व ३ ह्या त्यांच्या मुली आहेत. अन्य कोणीही त्यांचे वारसदार नाही.

२) कै.मंगेश पांडुरंग पाटील यांचा मृत्यू दि.०७/०८/२०२० रोजी राहत्या घरी झाला. के.एल.४/६६/२, सेक्टर ४ ई, गर्व्हमेंट कॉलनी जवळ, कळंबोली नोड एस.ओ., पनवेल, जि.रायगड येथे झाला.

३) कै.मंगेश पांडुरंग पाटील यांची मिळकत खालीलप्रमाणे.

| गाव | पूर्ण पत्ता व मिळकतीचे वर्णन | क्षेत्रफळ | बाजारमुल्य |
|---|---|---|---|
| कळंबोली पनवेल | के.एल.४/६६/२ सेक्टर ४ ई गर्व्हमेंट कॉलनी जवळ, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ | १४७ स्क्वेअर मीटर | २,५०००० (दोन लाख पन्नास हजार मात्र) |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळण्याकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय या मिळकतीला वारस नाही असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यास ग्रामस्थांचा विरोध

जागेत मनमानी करून बांधण्यात येत असल्याने ग्रामस्थांची गैरसोय होणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. या निवेदनाच्या अनुशंघाने न्याय न मिळाल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करु असा इशारा या ग्रामस्थांनी दिला आहे.

## वाळूचे हौद केले नष्ट, पनवेल तहसीलची कारवाई

काम सुरू केलेले आहे. खाडीकिनारी वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन सक्शन पंप आढळून आले. ते तेथील खाडी पत्राच्या पाण्यात बुडवून नष्ट करण्यात आले आहेत. अशा प्रकारे जर कोणी अनधिकृत वाळू उपसा करण्याचा प्रयत्न करेल त्याच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार विजय तळेकर यांनी दिली.

## सिडकोची सर्व कामे आम्ही बंद पाडु : महेंद्र घरत

प्रलंबित मागण्यांसाठी सिडकोच्या बेलापूर येथील कार्यालयात कामगार नेते आणि प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती चे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी प्रकल्पग्रस्त शेतकरी व सिडको अधिकारी यांची बैठक घेऊन प्रलंबित प्रश्नांसंदर्भात चर्चा केली.

सिडकोने प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत अन्यथा सिडकोची सर्व कामे आम्ही बंद पाडून सिडको विरोधात आम्हाला आंदोलन उभे करावे लागेल असा सज्जड दम या बैठकीदरम्यान येण्यात आला. यावर सिडको अधिकारी यांनी ताबडतोब आम्ही माहिती घेऊन प्रलंबित राहिलेले प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न करु असे वचन कामगार नेते महेंद्र घरत आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिले.

या बैठकीला राष्ट्रीय इंटक चे सचिव कामगार नेते महेंद्र घरत, अतुल पाटील,सुरेश पाटील इंटक चे उरण तालुका अध्यक्ष संजय ठाकूर, बाळा पाटील, नरेश घरत, यशवंत घरत, धर्मा पाटील, सुरेश ठाकूर, धर्मदास घरत, दिपक पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सोसायटी नाका परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोसायटी नाका परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे, उंची ५ फूट, रंग सावळा, डोळे काळे, चेहरा उभट, मध्यम बांधा, नाक सरळ, केस काळे वाढलेले, दाढी मिशीचे केस काळे असून उजव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीत जे.के.बी. असे गोंदलेले व डाव्या हाताच्या मनगटावर ऊ जागृत राम असे गोंदलेले आहे.

अंगात तांबड्या रंगाचा फूल बाह्यांचा शर्ट व काळ्या रंगाची फूल पँट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-२७४५२३३३ किंवा सहा. पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांच्याशी संपर्क साधावा.

## मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरात असलेल्या एका उघड्या खिडकीत अज्ञात इसमाने हात घालून व्हिवो कंपनीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना कामोठे गावात घडली आहे.

समिर रज्जाक अन्सारी (रा.-कामोठे गाव) यांचा सात हजारांचा मोबाईल चोरून नेल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कोलाड पाटबंधाऱ्याची कालवा सफाईत जलदगती लवकरच शेतकऱ्यांना पाणी पुरवठा होण्याची चिन्हे

**दै.रायगड नगरी । विश्वास निकम**

**गोवे-कोलाड** : रोहा तालुक्यातील कुंडलिका सिंचनाखालील उजवातीर व डावातीर कालवा कोलाड पाटबंधारे विभागाकडून सफाई कामाची जलदगती असल्याचे दिसून येत असल्याने माळ रान झालेले कालवे आता पाणीमय होन्याची चिन्ह दिसून येत असल्याचे सर्वस्तरांतून बोलले जात आहे.

गेली अनेक वर्षे पाण्याअभावी असलेला झाडे झुडपं माती घनकचऱ्याने भरलेला या काळव्यामुळे येथील शेतकरी गेली अनेक वर्षे चिंताग्रस्त झाले आहेत. त्यामुळे ईडा पीड़ा टळो बळीचे राज्य येवो हि म्हण आता भात कोठार म्हणून इतिहासात जमा झालेल्या रायगडातुन हद्दपार झाल्याची चिंता शेतकऱ्यांच्या नजरेतून दिसत होती. परंतु पाटबंधारे खात्याला उशीरा कि ना होईना या बाबत जाग आली आणि जलसंपदा खात्याच्या वतीने या कालव्यांची साफसफाई व उर्वरित कामांना गती देत कालव्यांची कामे युद्ध पातळीवर सुरू असल्याचे दिसून येत आहेत, शेतीला सोडाच मानवी स्वच्छता गुंरढोराना मागील आठ ते नऊ वर्षा पासून कोलाड़ पाठबंधारे अभूत पूर्व पुई पुगांव खांब वगळता उजवातीर नडवली ,तळवली, चिल्हे, देवकान्हे, उडदवने, मालसाई ,धामणसई, निडी, अष्टमी, तसेच डावातीर आंबेवाड़ी, संभे, किल्ला, धाटाव, वाशी, लांढर, निवी, भूवनेश्वर, आशा गावांना पाणी दिले गेले न्हवते मानवी जीवनाचे सोडाच मात्र गुरे ढोरे पशु प्राणी यांना गाव व गोटा शेजारी असलेला



कळवा निकामी असल्याने पाण्याअभावी पशु प्राण्यांना वन वन फिरावे लागत होते पाणी टंचाईमुळे दरवर्षी परिसरातील तीन चार गुरांची पाण्याअभावी जीवित हानी होत असे मात्र सध्या सुरू असलेल्या पाठबंधाऱ्या खात्याच्या कामांची जलदगती पाहून लवकरच मानवी जीवनाला व पशु प्राणी गुरे ढोरे यांना पाणी मिळण्याचे संकेत मिळत आहेत.

कोलाड पाटबंधारे विभाग डोळवहाल सिं-चनातून या कालव्याना पाणी सोडण्याचे काम करतात परंतु सन २०१२/१३ या कालावधीत जलसंपदा खात्याने हे कालवे दुरुस्ती व काँक्रीटीकरनासाठी घेतले लाखो करोडो रुपये यावर पाण्यासारखे पाठबंधारे विभागाने खर्च केले मात्र कोणतेही काम पूर्ण करता आले नाही मात्र कालवे होते ते नव्हते झाले. गेली सात आठ वर्षे येथील कालव्याला पाणी नसल्याने शेतकरी रब्बी हंगाम भात शेतीचा पीक घेऊ शकत नाही. त्यामुळे गेली अनेक वर्षे त्यामुळे हजारो हेक्टरवर भात पीक घेणारे शेतकऱ्याना त्याचा मोठा नुकसान सहन करावा लागत आहे.

डोळवहाल सिंचनातून तातकालीन केवळ शेतकऱ्यांसाठी जलसंपदा खात्याने या कालव्याची निर्मिती केली. मात्र हे पाणी आता शेतकरी कष्टकऱ्याना तर सोडाच मात्र त्यांच्या गुरेढोरे पशु प्राण्यांना देखील मिळत नसल्याने चिंतेची बाब बनली होती. त्यातच गावागावातील विहिरींनी तळ गाठला गावात नळपाणी योजनेचे पाणी केवळ एकवेळ दिले जाते. येथील कुंडलिकेच्या तीरावर वसलेल्या लोकवस्तीच्या मानवी जीवनाला पुरेसा पाण्याचा वापर करतात येत नाही. पाण्याअभावी गुरांना ओला चारा नसल्याने सुका चारा खाऊन आपली भूक भागवतात. मात्र पाण्यासाठी त्यांना शोध मोहीम काढत वणवण भटकावे लागते ही बाब अनेकदा वृत्तपत्रांच्या माध्यमातून समोर आणून दिली गेली. तरी देखील खाते डोळेझाक करत असतात. परंतु पाटबंधारे विभागाचे अधिकारी वर्गाने याचा जलदगतीने पाठपुरावा करत याचे युद्ध पातळीवर सफाईचे व दुरुसाठीचे हाती घेतलेले काम लवकरच पूर्ण करून पाणी मिळेल असे बोलले जात आहे.

प्रति वर्ष सहालाबाद प्रमाणे येथील शेतकरी वर्ग कोलाड पाटबंधारे विभागाकडे पाणी सोडण्यासाठी मागणी करतात ही मागणी नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात पाण्याची मागणी करतात. मात्र कोलाड पाटबंधारे विभागाचे संबधित अधिकारी वर्गाचे प्रतिउत्तर की कालव्याची सफाई सुरू करून पाणी सोडण्यात येईल. मात्र आजतागत त्याची सफाई झालीच नाही अथवा पाणी देखील नाही. केवळ शेकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम हे खाते करत केराची टोपली दाखवत असल्याचे दिसून येत होते. सिंचनाचा पाणी शेतकऱ्यांना व त्यांच्या गुरांना नाही मात्र उद्योग धंदे व्यवसायिक तसेच वीज निर्मिती करण्यासाठी या पाण्याचा वापर केला जातो मात्र शेतकरी व त्यांच्या गुरांना पाण्यावाचून वंचित राहावे लागत होते मात्र आता सफाईचे कामांचे जोश पाहून समाधानकारक पाणी मिळेल अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

# ३७ वर्षांनी एकत्र आले माजी विद्यार्थी.... जुन्या आठवणींना दिला उजाळा

### सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मीकांत मोटवानी यांचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शाळा, कॉलजचे दिवस संपले की प्रत्येकजण आपआपल्या करिअरसाठी वेगवेगळ्या क्षेत्राकडे धाव घेतो. मात्र, ज्या शाळेमध्ये, ज्या कॉलेजमध्ये आपण शिकलो, लहानाचे मोठे झालो, वेगवेगळ्या भागातील विद्यार्थ्यांबरोबर आपण मैत्रीचे नाते जोडले, ती नाळ मात्र तशीच असते. सर्वांना एकदा भेटावे, एकमेकांशी हितगुज करावे, असे सर्वांना वाटते. मात्र ३७ वर्षांचा मोठा कालखंड लोटल्या नंतर प्रत्येकजण आपआपल्या नोकरीधंद्यात व्यस्त असल्याने ते सहजासहजी शक्य होत नाही. मात्र, ते अशक्यही नसते हे नवी मुंबई स्कूल वाशी विद्यालयातून १९८४ साली उत्तीर्ण होऊन गेलेल्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. आणि तब्बल ३७ वर्षांपूर्वीच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला.

ज्या शाळेत आपण लहानाचे मोठे झाले, ज्या मातीने आपल्याला घडवलं, आयुष्य जगण्याचे तंत्र मंत्र दिले त्या भूमीत पुन्हा एकदा त्याच सवंगड्यांसह एक डाव पुन्हा मांडण्याची संधी चालून आली ती माजी विद्यार्थ्यांच्या भेटीच्या निमित्ताने....नवी मुंबई स्कूल वाशी नवी मुंबईच्या विद्यालयामधून १९८३-८४ या शैक्षणिक वर्षात बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी एक दोन नव्हे तर चक्क ३७ वर्षांनी पुन्हा एकत्र आले. तळोजा पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मीकांत मोटवानी, शेअर मार्केटमधील किरण औटी यांनी पुढाकार घेत आपल्या जुन्या मित्राना भेटण्याचे नियोजन यांनी केले.

त्यानुसार नवी मुंबई येथील नवरत्न हॉटेलमध्ये नुकताच माजी विद्यार्थ्यांचा अनोखा मेळावा येथे अभुतपूर्व उत्साहात पार पडला. १९८३-८४ पासूनचे माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी मेळाव्यास आपुलकीने उपस्थिती दर्शवत विद्यालायावरील आपले प्रेम व्यक्त केले. यानिमित्ताने जुन्या मित्रांची भेटही घडून आली. या विद्यालयातून हे विद्यार्थी १९८३-८४ साली केवळ बाहेर पडलेले नसून ते स्थिर भविष्यासाठी ज्ञानाची परिपूर्ण शिदोरी घेऊन कर्तुत्वसंपन्न होण्यासाठी बाहेर पडलेले माजी विद्यार्थी आहेत, यातील काही बडे राजकारणी, पोलीस, शेअर मार्केट तसेच विविध क्षेत्रात आहेत तर अनेक माजी विद्यार्थिनी यशस्वी उद्योजिका, समाजसेविका त्याच प्रमाणे आदर्श गृहिणी आहेत. ज्यांच्या ऋणानुबंध आजही या शाळेशी जोडलेला आहे. अनेक माजी विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी यावेळी मनोगते व्यक्त केली.

# पथदिव्याचे वीजबिल शासनान अदा करावे ; सरपंच संघटनेची मागणी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतचे पथदिवे वीजबिल भरणा न केल्याने खंडित करण्यात आले आहे. त्यामुळे म्ह-सळा नगरपंचायत वगळता तालुक्यातील सर्वच गावांमध्ये अंधार झाला आहे. त्यामुळे जनतेला नाहक त्रास सहन सहन करावा लागत आहे. तसेच होळीचा सण जवळ आल्याने आणखी अडचणी निर्माण होणार आ-हेत. यापूर्वी पथदिव्याची बिले शासनाकडून भरली जात होती.

ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीचे उत्पन्न कमी असल्याने वीजबिलाचा बोजा ग्रामपंचायतीला भरणे शक्य होत नाही.त्यामुळे शासनाने पूर्वीप्रमाणे वीज बिल भरून वीज पुरवठा खंडित केलेले पथदिवे पुन्हा चालू करावे अशी मागणी म्हसळा तालुका ग्रामपंचायत सरपंच संघटनेने तहसीलदारांना निवेदन देऊन केली आहे. यावेळी खरसई सरपंच निलेश मांदाडकर, सरपंच चंद्रकांत पवार, सरपंच गणेश बोर्ले, रमेश खोत, अनंत कांबळे, अनंत नाक्ती, फारुक हजवाने, महेश घोले, रेश्मा कांनसे आणी तालुक्यातील मोठया प्रमाणात सरपंच उपस्थित होते.

## कपाटाचे लॉकर मधून एक लाखाच्या दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोखंडी कपाटातील तिजोरी मध्ये ठेवलेले एक लाख तीन हजार रुपयांच्या दागिन्यांची अज्ञाताने चोरी केली आहे. चोरा विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेक्टर ११ तळोजा फेस वन येथील पल्लवी नितीन कांबळे यांनी दागिने त्यांचे कपाटातील तिजोरीमध्ये ठेवले होते. अज्ञात चोरट्याने तिजोरी चा दरवाजा उघडून लॉकरमधून दागिन्यांची चोरी केली आहे.

---

मा.बहिर साहेब

अर्जदारातर्फे वकील : ॲड.यशवंत पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०६/२०२१

कै.लक्ष्मीनारायण के बंडी यांचे कायदेशीर वारस खालीलप्रमाणे
१) श्रीमती.प्रमिला लक्ष्मीनारायण बंडी
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीधर लक्ष्मीनारायण बंडी
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार १ व २ रा.के.एल ४, बिल्डींग नं.६५/१,
सेक्टर ४ ई, कळंबोली, पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

१) या जाहीर नोटीसने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै. लक्ष्मीनारायण के बंडी यांचे कायदेशीर वारस अर्जदार नं.१ ही त्यांची पत्नी असून अर्जदार नं.२ हा त्यांचा मुलगा आहे. अन्य कोणीही त्यांचे वारसदार नाही.

२) कै.लक्ष्मीनारायण के बंडी यांचा मृत्यू दि.०५/०७/२०२० रोजी संस्कृती टाऊनशिप घर नं.१२-अे ४०-१०७ घाटकेसार मंडल मेडचाल मालकाजगिरी जिल्हा राज्य तेलंगा ५०००८८ येथे झाला. कै.लक्ष्मीनारायण बंडी यांच्या मिळकतीचा (घराचा) पत्ता : रा.के.एल.४/६५/१ सेक्टर ४ ई कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड हा आहे.

३) कै.लक्ष्मीनारायण के बंडी यांची मिळकत खालीलप्रमाणे.

| गाव | पूर्ण पत्ता व मिळकतीचे वर्णन | क्षेत्रफळ | बाजारमुल्य |
|---|---|---|---|
| कळंबोली | के.एल.४/६५/१ सेक्टर ४ ई कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड | १४७ स्क्वेअर मीटर | ६,५०००० .०० |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळण्याकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय या मिळकतीला वारस नाही असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.बहिर साहेब

अर्जदारातर्फे वकील
शशिकांत आ. म्हात्रे
प्रल्हाद जी. खोपकर
निलेश द. हातमोडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (सि.डी.डिव्हीजन) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३२३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०४/२०२१

१) श्रीमती.तुळसाबाई बळीराम शेळके
वय : ७६ वर्षे, धंदा : घरकाम/शेती
२) श्री.वसंत बळीराम शेळके
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.प्रदीप बळीराम शेळके
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती
१ ते ३ सर्व रा.ओवेपेठ, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.वत्सला कृष्णा मोकल
वय : ४६ वर्षे, धंदा : घरकाम/शेती
रा.मळेघर, ता.पेण, जि.रायगड
५) सौ.वैशाली कैलास घरत
वय : ३२ वर्षे, धंदा : घरकाम/शेती
रा.गव्हाण कोपर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ हिचे पती व २ ते ५ यांचे वडील बळीराम मुंगा शेळके हे दि.१०/०७/१९९५ रोजी मौजे : ओवेपेठ, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.बळीराम मुंगा शेळके त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे मौजे : ओवे, ता.पनवेल येथे खालील वर्णनाच्या जमीन मिळकती होत्या. मयत बळीराम मुंगा शेळके यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर जमिनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झाल्या आहेत.

२) मयत बळीराम मुंगा शेळके यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे असलेली खालील वर्णनाची मिळकती :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड खालील वर्णनाच्या मिळकती.**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| ५२७ | ४३ | २ | ०-३६-९ | ६.६२ |
| - | ११० | १+४ ब | ०-२४-५ | ४.०७ |
| - | ११९ | १ | ०-३०-० | ४.७५ |
| - | ४३ | ४ | ०-३९-० | ६.८८ |
| - | १२३ | १+२ | ०-३४-९ | ४.२८ |

अर्जदार हे वरील मिळकती संदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आहेत. वरील मिळकतीच्या अर्जदार यांच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट श्रीमती. तुळसाबाई बळीराम शेळके वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व कै.बळीराम मुंगा शेळके यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार नं.१ ते ५ हेच कायदेशीर वारसदार आहेत असा वाारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२०/०३/२०२१ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.पाठक सो

अर्जदारातर्फे वकील
शशिकांत आ. म्हात्रे
प्रल्हाद जी. खोपकर
निलेश द. हातमोडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (ज्यु.डी.) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.४२४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२६/०४/२०२१

१) श्री.बळीराम महादेव पाटील
वय : ७२ वर्षे, धंदा : निवृत्त/शेती
२) श्री.धर्मा महादेव पाटील
वय : ६७ वर्षे, धंदा : निवृत्त/शेती
३) श्री.राम महादेव पाटील
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
१ ते ३ रा.भंगारपाडा, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.चंद्रभागा हिरामण भोईर
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.हौसाबाई दामोदर मढवी
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.सुनिता किसन भोईर
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मोहोपे, पो.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड
७) सौ.निर्मला महादू भोईर
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मार्केवाडी, पो.कडाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

अर्जदार यांची आई कै.अनुबाई महादेव पाटील ह्या दि.२३/०८/२०१९ रोजी मौजे : भंगारपाडा, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावल्या आहेत. कै.अनुबाई महादेव पाटील यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे मौजे : दापोली, ता.पनवेल येथे खालील वर्णनाची जमीन मिळकती होत्या. कै. अनुबाई महादेव पाटील यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर जमिनी नवी मुंबई सिडको प्रकल्पाकरिता संपादीत झाल्या आहेत.

कै.अनुबाई महादेव पाटील यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे सामाईक असलेली खालील वर्णनाची मिळकती :-

**परिशिष्ट 'अ'**

**सिडको संपादीत १२.५ टक्के प्रमाणेच्या मिळकती**

**मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१४ | ६२ | १ | ०-३१-८ | ७.१४ |
| २ | २१४ | १२५ | ३ | ०-४६-० | ४.१९ |
| ३ | ९१ (२) | ११३ | ४ | ०-२६-० | ०.३१ |

**परिशिष्ट 'ब'**

**सिडको संपादीत २२.५ टक्के प्रमाणेच्या मिळकती**

**मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | ६५ | ४ | ०-०५-० | ०.३१ |

अर्जदार हे वरील मिळकती संदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जदार यांच्या हिश्श्याच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट श्री.बळीराम महादेव पाटील वगैरे ६ ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व अर्जदार मयत अनुबाई महादेव पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत असा वाारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२०/०३/२०२१ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.पाठक सो

अर्जदारातर्फे वकील
प्रल्हाद जी. खोपकर
निलेश द. हातमोडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (ज्यु.डी.) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.४३४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२६/०४/२०२१

१) श्रीमती.खारुबाई नारायण धुमाळ
वय : ९० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.मच्छिंद्रनाथ नारायण धुमाळ
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
३) श्री.अरुण नारायण धुमाळ
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.निलेश नारायण धुमाळ
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.जगदीश नारायण धुमाळ
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
६) श्री.धनराज नारायण धुमाळ
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
रा.कोपर (कोल्ही), ता.पनवेल, जि.रायगड
७) सौ.स्मिता दिलीप म्हात्रे
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पाणदिवे, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ७ यांचे वडील नारायण नागू धुमाळ हे तारीख ०२/११/२०२० रोजी मु.अपोलो हॉस्पिटल बेलापूर, नवी मुंबई येथे मृत्यू पावले आहेत. मयत नारायण नागू धुमाळ यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे मौजे : वडघर व मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची जमीन मिळकती होत्या. सदर जमिनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झाल्या आहेत.

मयत नारायण नागू धुमाळ यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे सामाईक असलेली खालील वर्णनाची मिळकती :-

**मिळकतीचे वर्णन**

**परिशिष्ट 'अ'**

**सिडको कार्यालयातील वाटपपत्र क्र.सिडको/आंवित/ पुनःस्थापना/कोपर/२०१५/३०३९ दिनांक ०३/०८/२०१५**

| सांकेतिक क्रमांक | सर्वेक्षणा नुसार बांधकाम क्र. | बांधकामाचे पाया बांधीव क्षेत्र | बांधकामाचा वापर | आदेशा नुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र चौ.मी. | भूखंड वाटपाचा तपशिल: भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| KOL-ICOG-28 | KP-134 KP 81 A KP 81 B | १०५.२८ | निवासी | १९२.२० | वडघर उपरोक्त प्रमाणे | ४ | ७९ | ५८०.०० |

**परिशिष्ट 'ब'**

**सिडको कार्यालयातील १२.५ टक्के प्रमाणे**

**सिडको/भूमी/साट्यो/७२४/करंजाडे/२०२१/१४३**

| अ. क्र. | गावाचे नाव | निवाडा /केस क्र. | सर्व्हे / हिस्सा क्र. | संपादीत क्षेत्र हे.आर.पॉ. | भूखंड देण्यास पात्र असलेल्या व्यक्तींची नावे | पात्रते नुसार देय क्षेत्र चौ.मी. | भूखंडाचा दर प्रती चौ.मी. रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोपर | १२९अ | ६१/९ ९४/१२ ९६/१० | ०-२०-३ ०-११-३ ०-१४-३ | कै.नारायण नागू धुमाळ व इतर | ४०० | १२.५० |
| २ | कोपर | १२४/अ | ६१/८ ९८/११ | ०-२१-४ ०-१४-३ | | २५० | १२.५० |
| ३ | कोपर | १२९ | ९३/६ | ०-०९-७ | | १०० | १२.५० |
| ४ | कोपर | ११५ | १०८/२ +६/२ | ०-०५-१ | | ४० | १७.०० |

अर्जदार हे वरील मिळकती संदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जदार यांच्या हिश्श्याच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट श्रीमती.खारुबाई नारायण धुमाळ वगैरे ६ ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व अर्जदार मयत नारायण नागू धुमाळ यांचे कायदेशीर वारसदार आहेत असा वाारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२०/०३/२०२१ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १४ वर्षीय मुलीस कोणत्यातरी अज्ञात इसमाने कशाचे तरी अमिष दाखवून तिच्या भावाच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

सदर मुलगी रंगाने गोरी, बांधा सडपातळ, उंची ५ फूट, केस लांब व सरळ, उजव्या हातावर सिमरन असे गोंदलेले आहे. चेहरा गोल, नाक सरळ, डोळे काळे आहेत. अंगात राखाडी रंगाची कुर्ती व पिवळ्या रंगाची लेगिन्स घातलेली आहे. या मुलीबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-२७४५२३३३ किंवा सहा. पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांच्याशी संपर्क साधावा.

## केलटे मध्ये मोबाईल व्हॅन लोकन्यायालय व कायदेविषय शिबिराने केले जनतेला जनजागृत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तालुका विधी व सेवा समिती श्रीवर्धन म्हसळा व मा जिल्हा न्यायालय अलिबाग यांच्या आदेशानुसार तालुका विधी सेवा अंतर्गत केलटे ग्रामस्थ मंडळ सभागृह ठिकाणी सेवानेवृत्त नायाधिश उपाध्य गट विकास अधिकारी वाय एम प्रभे सहा गट विकासअधिकारी राजेश कदम सरपंच गणेश बोर्ले , उपसरपंच पिचुर्ले ,उमेश पवार आशाताई कशिष सावंत गाव अध्यक्ष शांताराम कोबनाक , कीसन पवार ,देवजी चव्हाण ग्रामपंयात सचिव भुपेंद्र अहिरे वकील शेख ,मुकेश पाटील विस्तार अधिकारी गायकवाड अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान कायदा काय कायदे कसे असू शकतात पुढे त्याचे चांगले परिनाम वाईट परिनाम कसे होतात कौटुबीक वाद , जमिन ,आपआपसा-तले लहान मोठे वाद ,घटस्फोट , अशा विविध कायदे व त्यातील महत्वपूर्ण गाभा संदर्भात सविस्तर माहीती देत सर्वांचे लक्ष वेधले शासन निर्मित केलेले कायदे हे प्रत्यकाचे संरक्षण करण्यासाठी आहेत त्याचा योग्य वापर केल्यास प्रत्यकाचे तंटे सहज मिटवू शकतात कायदा प्रत्येकाचा हक्क आहे प्रसंगाच्या वेळी न्यालयात जाऊन आपली बाजू मांडा आपल्या सुरक्षेतेखाली आपली बचाव केला जातो समाजात सलोखा राखण्यासाठी कायदेचा चांगला वापर केला जातो महिलांनवर अनेक अत्याचार होतात त्या साठी शासनाने विविध कायदे निर्माण केले आहे त्या साठी न घाबरता आपण समोर या अन्याय तुम्ही बचवू नका दादागिरी पचवूनका आपण आपण सुरक्षित रहावे हे शासनाचे महत्वाचे धोरण आहे त्या साठी कायदयाचा वापर करा अशा प्रकारचे प्रबोधन केले कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन ग्रुप ग्रामपंचायत सरपंच गणेश बोर्ले व त्यांचे सदस्य व ग्रामस्थ यांनी केला कोरोनाचा नियम पाळत शिस्तबद्धपध्दीने केला होता.

# सुधागड तालुक्यातील दांडकातकरवाडी ग्रामस्थ स्मशानभूमी पासून वंचित

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : सुधागड तालुक्यातील व-हाड-जांभुळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील येथील दांडकातकरवाडी येथे स्मशानभूमी नसल्याने अदीवासी बांधवांना अंत्यविधीसाठी वणवण करावा लागत आहे. याबाबत वारंवार आवाज उठवण्यात येत असूनही हा विषय निकाली निघत नाही.

व-हाड-जांभुळपाडा ग्रामपंचायत विकासाच्या दिशेने चाललेल्या ग्रामपंचायतीत अदीवासीवाडीची समस्या कायम आहेत. व-हाड-जांभुळपाडा ग्रामपंचायत दिवसेंदिवस प्रगती पथावर विकास कामे करत असताना दांडकातकरवाडी स्मशानभूमी नसणे ही निश्चितच समाधानकारक बाब नाही.



या दांडकातकरवाडीची २७५ लोक संख्या असुन जांभुळपाडा गावापासुन हाकेच्या अंतरावर असणा-या या दांडकातकरवाडी म्हणजे समस्यांचे माहेर घर म्हणून ओळखली जाते.

पाण्यापासुन ते मुलभुत सविधांपासुन वंचित आहे.दांडकातकरवाडी अदीवासीवाडीवर एखादा व्यक्ती मरण पावला की गावापासून काही अंतरावर दगड रचुन त्याच्यावर मयत व्यक्तीला ठेऊन अग्नी द्यावी लागते. अशा भयानक परिस्थितीत अंत्यविधी करावा लागत असल्याने नागरिक हैराण आहेत. पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होत असून, अनेकदा भर पावसातच अंत्यविधी करावे लागतात. त्यामुळे प्रेत जळत नाही.लाकडे ही ओली होत असल्याने मृत्य देहाची विटंबना होत असते. आशा अनेक समस्यांना या अदीवासी बांधवांना तोंड द्यावे लागते. अदीवासी बांधवांना आपल्या हक्काच्या जागे पासुन वंचित राहवे लागले आहे. आज ही अंतविधीसाठी वणवण करावे लागत आहे. आम्हा आमच्या हक्काची स्मशाधभूमी केव्हा मिळणार केव्हा ? असा संतप्त सवाल दांडकातकरवाडी ग्रामस्थ विचारत आहेत.

# जोरदार वाऱ्यामुळे मच्छीमारी ठप्प, खवय्यांमध्ये नाराजीचा सूर

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील दहा ते पंधरा दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यात तसेच जवळजवळ संपूर्ण कोकणातच जोरदार वारे वाहत असल्यामुळे मच्छिमारी पूर्ण ठप्प झाल्याचे पाहायला मिळत आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यामुळे समुद्रामध्ये मोठ्या प्रमाणात लाटा देखील उसळत आहेत. पाण्याला मोठ्या प्रमाणावर करंट असल्यामुळे सदर पाण्यामधून मच्छिमारी बोट चालवणे मच्छीमारांना कठीण होऊन बसत आहे. या हंगामा मध्ये श्रीवर्धन तालुक्यात चांगल्या प्रमाणावरती मच्छी मिळते. पापलेट, सुरमई, हलवा, कोळंबी, बांगडा त्याचप्रमाणे बगी, मांदेली, बीलीज,मुशी,ढोमे, बोईट अशाप्रकारची मच्छी बाजारात मोठ्या प्रमाणात येत असते. परंतु जोरदार वाऱ्यामुळे मच्छिमारीसाठी बोटी पाठवणे मच्छीमारांना अतिशय कठीण होऊन बसले आहे. अनेक मच्छीमारांनी तर आपल्या बोटी जीवनाबंदर येथून सरळ खाडीमध्ये नेऊन उभ्या केल्या आहेत. मार्च महिना सुरू झाल्यानंतर राज्यामध्ये कोरोनाचे रुग्ण देखील मोठ्या प्रमाणावर वाढू लागले आहेत. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण खूप कमी झाले आहे. पर्यटकांचे येण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे मच्छीची मागणीदेखील खूप कमी झाली आहे. मागील वर्षी लॉकडाऊन, त्यानंतर आलेले चक्रीवादळ व सतत खराब हवामानामुळे आधीच मच्छिमार बांधव पुरता मेटाकुटीला आला आहे. मच्छीमारी बंद असल्यामुळे बर्फाचे कारखाने देखील आर्थिक मंदीत आले आहेत. कारण मच्छी मिळत नसल्यामुळे बर्फ़ाला मागणी खूप मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. अनेक मच्छीमार सोसायट्यांचा डिझेल परतावा देखील अद्याप न मिळाल्यामुळे मच्छीमार अजूनच आर्थिक संकटात सापडलेला आहे. येत्या आठ दिवसात हवामानाची परिस्थिती न सुधारल्यास मच्छिमार बांधवांवरती उपासमारीची वेळ येते की काय? अशी शंका निर्माण झाली आहे.

मागील वर्षी मार्च महिन्यामध्ये लॉकडाउन सुरू झाल्यानंतर मच्छीची आवक असून सुद्धा मच्छीला मागणी नसल्यामुळे मच्छिमारी नौका मासळी साठी समुद्रात जात नव्हत्या. त्यानंतर खराब हवामान व इतर कारणांमुळे देखील अनेक वेळा मच्छिमारी व्यवसाय संकटात होता. या वर्षी देखील जोरदार वारे वाहत असल्याने मच्छीमारी व्यवसाय पूर्णपणे ठप्प आहे. येत्या काही दिवसात परिस्थिती सुधारली नाही तर मच्छिमार बांधवांवरती उपासमारीची वेळ आल्याशिवाय राहणार नाही.

**- भारत चोगले, मच्छीमार, जीवना बंदर, श्रीवर्धन**

# कामगार नेते महेंद्र घरत यांच्या माध्यमातून हिंद टर्मिनल सफाई कामगारांना पगारवाढ



**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोनामुळे अर्थव्यवस्था ढासळली असतांना अस्थापनांना उदयोगधंदे सुद्धा सांभाळणे कठीण जात आहे. अशा परीस्थीतीत सुद्धा कामगार नेते महेंद्र घरत यांची न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटना व्यवस्थापन व कामगार यांची योग्य सांगड घालत कामगारांना स्वाभी मानाने जगता येईल असे प्रयत्न करत आहे.

कोरोनाचा कोणताही परिणाम संघटनेच्या कामकाजावर झालेला नाही. दरवर्षी १८ ते २० करार होत असतात त्याच प्रमाणे जानेवारी २०२१ पासुन तिसरा पगारवाढीचा करार, हिंद टर्मिनल मधील सफाई कामगारांसाठी ३२००/- रूपये पगारवाढीचा करार दिनांक १९ मार्च रोजी सहाय्यक कामगार आयुक्त, रायगड यांच्या कार्यालयात आंधळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

या करारनाम्यानुसार कामगारांना तीन वर्षासाठी ३२०० रूपये पगार वाढ, बोनस, रजांमंधे वाढ, गणवेश व इतर सोई सुविधा देण्याचे मान्य करण्यात आले.

या करारनाम्याप्रसंगी न्यु मॅराटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष पि.के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, मे. सद्गुरू कृपा चे व्यवस्थापक अभिजीत पाटील व गजानन शिंदे तसेच कामगार प्रतिनिधी शशिकांत भोईर, गणेश कोळी, सुनंदा पाटील, मेहिनी ठाकूर, वैशाली घरत, हौसा ठाकूर आदी उपस्थीत होते.

# ८ लाख ३४ हजार रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इंटेरियरच्या कामाकरता कारागीर यांसाठी आणि टाइल्स येण्यासाठी पैसे घेऊन काम न करता फसवणूक केल्याचा प्रकार खारघर येथे घडला आहे. आरोपी विरोधात खारघर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर २३ येथील रोली प्रदीप श्रीवास्तव यांना त्यांच्या नवीन घरातील इंटेरियरचे काम करायचे होते. यावेळी इंटेरिअर डेकोरेटर भानु प्रताप सिंग यांना त्यांचा फोन आला. त्याने साईडची पाहणी केली. आणि त्यांच्यात घरातील किचन, पीओपी, टाइल्स, इलेक्ट्रिक आणि कलर या कामांचे सात लाख ४२ हजार रुपये मध्ये काम ठरले. यावेळी एग्रीमेंट न बनवता चांगलं काम करून देतो असे त्यांनी सांगितले.

श्रीवास्तव यांनी भानु प्रताप सिंह यांना ५० हजार रुपयांचा चेक दिला. सप्टेंबर २०२१ या महिन्यात त्यांनी फ्लॅटची चावी काम करण्यासाठी दिली. यावेळी एक लाख रुपये रोख दिले. भानु प्रताप सिंह यांनी त्यांच्या हॉलमधील टाइल्स, मेन डोअर आणि किचनमधील टाईल्स काढून घेतल्या व काम सुरू केल्याचा दिखावा केला. त्यानंतर पुढील कामासाठी पैसे मागून श्रीवास्तव यांनी आणखी दोन लाख रुपये त्यांना दिले. मात्र रक्कम घेऊन देखील त्याने किचनचे किरकोळ काम केले. व काम पूर्ण करण्यास टाळाटाळ केली.

त्यानंतर श्रीवास्तव यांनी भानू प्रताप याना फोन करून काम पूर्ण करा, अन्यथा पैसे परत द्या असे सांगितले असता भानुप्रताप याने पूर्ण पैसे द्या, लगेच काम सुरू करतो असे त्यांना सांगितले. यावेळी भानुप्रताप याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला होता.

यावेळी श्रीवास्तव यांना भानु प्रताप सिंह याने टाइल्स कारागीर याचे १ लाख ८ हजार, स्टाईल सप्लायर याचे २४ हजार, गुलशन कुमार यांचे ७५ हजार, सागर प्रकाश याचे ५१ हजार, ब्रिजेश पांडे यांचे ६० हजार आणि प्लायवूड सप्लायर याचे ६६ हजारांचे सामान घेऊन त्यांना रक्कम दिले नसल्याचे समजले. आरोपी भानु प्रताप सिंग यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# जनशिक्षण संस्थानचे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम रोजगारसंधी देण्यास उपयुक्त : विजय कोकणे



**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : रायगड जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागामध्ये जनशिक्षण संस्थानमार्फत विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम शिकल्यानंतर अनेकांना रोजगार संधी प्राप्त करून उत्कर्ष साधला आहे. हे अभ्यासक्रम तरूण-तरूणींसह गृहिणी-पुरूषांनादेखील रोजगारसंधी देण्यास उपयुक्त असल्याचे सिध्द झाले असल्याने पोलादपूर तालुक्यातदेखील चांगला प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आहे, असे मत जनशिक्षण संस्थानचे संचालक विजय कोकणे यांनी व्यक्त केले.

पोलादपूर शहरातील जाखमातानगर येथे अश्विनी उमेश पवार यांच्या निवासस्थानी जनशिक्षण संस्थानचे संचालक विजय कोकणे आणि कार्यक्रम अधिकारी प्रतिक्षा चव्हाण यांनी महिला सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनीही पोलादपूर शहरामध्ये जनशिक्षण संस्थानतर्फे यापूर्वी मोबाईल दुरूस्ती व टेलरिंग क्लासेसचे वर्ग घेतल्याची माहिती देऊन केवळ प्रशिक्षण अभ्यासक्रम घेऊनही प्रत्यक्ष रोजगारनिर्मिती सुरू न केल्यास उत्कर्ष होत नसल्याने जास्ती-तजास्त लक्ष रोजगारनिर्मितीवर केंद्रीत करण्यासाठी प्रशिक्षणाथाअसह जनशिक्षण संस्थानतर्फेदेखील केले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी अश्विनी उमेश पवार यांनी महिला बचत गटांच्या माध्यमातून केलेल्या कामाची माहिती देत महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी काही प्रशिक्षणाची गरज असल्यास योग्य ते मार्गदर्शन मिळण्यासाठी महिलांच्या आग्रहावरून जनशिक्षण संस्थानच्या अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले आणि चांगले मार्गदर्शन मिळाल्याने महिलांमध्ये नक्कीच स्वावलंबी होण्यासोबतच कुटूंबाचे आर्थिक जीवनमान उंचाविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रतिक्षा चव्हाण यांनी सर्व उपस्थित महिलांनी कुटूंबाची आर्थिक प्रगती साधण्याच्या प्रयत्नात सहभाग घेतल्याबद्दल आभार मानले.

# आरोग्य तपासणी शिबिरे ही काळाची गरज : दिलावर महाडकर

## व्हेंचर फाऊंडेशन तर्फे शिघ्रे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : संपुर्ण जगात मागील वर्षापासून कोरोना जागतिक महामारीमुळे त्रासलेले असून पुन्हा या रोगाच्या दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन आरोग्याच्या दृष्टीकोनातून तप-ासणी शिबिरे ही काळाची गरज असून माझे जन्मगाव असलेल्या मुरुड तालुक्यातील शिघ्रे गावी व्हेंचर फाउंडेशन व ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येत असल्याचा मनोमन आनंद होत असल्याचे भावपूर्ण उदगार उद्घाटक प्रसिद्ध उद्योजक तथा समाजसेवक दिलावर महाडकर यांनी आयोजित कार्यक्रमाप्रसंगी काढले.



सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्हेंचर फाऊंडेशन तर्फे संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने मुरुड तालुक्यातील शिघ्रे येथील आरोग्य केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ, संयुक्त सचिव रोझारियो रातोस(पालघर जिल्हा), महाराष्ट्र महासचिव तुफैल दामाद, महाराष्ट्र सहसचिव महेंद्र चौलकर, तालुका अध्यक्ष शकील कडू, मुसद्दीक कादीरी,ग्रामपंचायत सरपंच संतोष पाटील, उपसरपंच महेंद्र दिवेकर, सदस्य, संजिवनी संस्थेचे विजय सुर्वे, जमात ए मुस्लिम समाज अध्यक्ष राशीद फहीम,शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशावर्कर, ग्रामस्थ व महिला संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रसिद्ध उद्योजक तथा समाजसेवक दिलावर महाडकर मान्यवरांच्या हस्ते फीत कापून आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विक्रांत राऊळ, विजय सुर्वे यांनी मनोगत व्यक्त केले. कोरोना महामारीत आपली व आपल्या कुटुंबियाची पर्वा न करता अविरतपणे सेवा देणाऱ्या मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविकांना फाऊंडेशन तर्फे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यादिवशी तज्ञ डॉ.शकील परदेशी, डॉ.मुश्ताक शिघ्रेकर, डॉ.फैजान मिसरी, डॉ.महीदा शिघ्रेकर यांनी शिघ्रे परीसरातील लोकांची आरोग्य तपासणी यामध्ये ताप, मधुमेह,रक्तदाब व साधारण तप-ासणी करण्यात आली.यावेळी रुग्णांना व्हेंचर फाऊंडेशन तर्फे मोफत औषधे देण्यात आली. परीसरातील दोनशेहून अधिक रुग्णांनी याचा लाभ घेतला.सुत्रसंचालन शिवप्रसाद रोडगे यांनी तर प्रास्ताविक शकील कडू व संतोष पाटील यांनी आभार मानले.

# द.ग. तटकरे वरिष्ठ महाविद्यालय तळा तर्फे विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप

**दै.रायगड नगरी । तळा**

श्री सिद्धिविनायक न्यास पुस्तक पेढी योजनेतंर्गत द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालय विभागांतर्गत गरीब व गरजू विध्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या पुस्तकाचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मंगेश देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कैलास निंबाळकर, ग्रंथपाल मनोज वाढवळ सर्व प्राध्यापक व प्रध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या योजनेतंर्गत महाविद्यालयातील १६४ गरीब व गरजू विद्यार्थ्यांनी मोफतपुस्तकाचा लाभ घेतला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वा-चनाची आवड निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व समजावे, गरीब विद्यार्थ्यांवर पुस्तकाचा आर्थिक भार पडू नये या उद्देशाने श्री सिद्धिविनायक ट्रस्टने ही योजना राबविली आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची पुस्तके मोफत दिल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर संस्था मुंबई यांचे आभार मानण्यात आले.